फेब्रुवारी २०११ – किंमत एक रुपया

एकमेकां सहाय करू ! अवघे धरू सुपंथं !!

# सेवा दीप

रोहिदास समाज पंचायत संघाचे मुखपत्र



नियोजित
संत रोहिदास भवन

# ‘यशाकडे नेहमी पायरी म्हणून पाहिले पाहिजे’

डॉ. मुकूंद सांगलीकर

‘यशाकडे नेहमी पायरी म्हणून पाहिले पाहिजे’ शिक्षण हे यशाची पहिली पायरी आहे. असे उद्‌गार प्रमुख पाहूणे **डॉ. मुकूंद सांगलीकर,** (माजी विभाग प्रमुख, संगणक शास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ) यांनी रोहिदास समाज पंचायत संघ, मुंबई, शिक्षण समिती आयोजित विद्यार्थी कौतुक व पारितोषिक वितरण सोहळा, रविवार दिनांक २ जानेवारी २०११, रोजी सपन्न झाला, त्यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना काढले. ते पुढे म्हणाले की, व्यवसाय ही यशाची पहिली पायरी असते. ”नापास मुलांची गोष्ट” हे पुस्तक आहे. ते वाचल्यावर त्यातून यश कसे संपादीत केले जाते, याची माहिती मिळते. नारायण सुर्वे यांची कविता ”माझे विद्यापिठ” हे वाचना योग्य आहे. तसेच डॉ. नरेंन्द्र जाधव यांचा ”माझा बाप” पुस्तक फार प्रेरणादायी आहे.

आपला समाज तरूण आहे. त्यातूनच संगणक युग आहे. भाषा, संस्कृतीचे आकलन व्हावे म्हणून लहान मुले संगणकावर बसून गेम खेळतात. त्यातून त्यांना ज्ञानाची उपजत मिळते. आजची पिढी टेक्नोलॉजी आत्मसात करणारी आहे. आमच्या वेळची पिढी फक्त शिक्षणाची होती. आज कॉम्पूटरची भाषा आहे. तसेच सायन्सची भाषा आहे. सन १९८४ साली संगणकाची प्रयोग शाळा झाली. प्रयोग शाळेत जाताना चप्पल बाहेर काढून ठेवावेलागत, कारण धूल लागते.



इ. १० वी मध्ये समाजात सर्व प्रथम आलेल्या कु. सुमित मनोज आंगळेकर यांचे पालक आई सौ. पूर्णीमा व वडील श्री. मनोज आंगळेकर यांचा सत्कार प्रमुख अतिथी डॉ. मुकूंद सांगलीकर करीत असतानाच्या छायाचित्रात डावीकडून प्रमुख अतिथी सौ. शैलजा गिरकर संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम, उपाध्यक्ष श्री. विजय सावर्डेकर, शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. सुभाष समजिसकर व पाठीमागे कोषाध्यक्ष श्री. संजीव दाभोळकर दिसत आहेत.

मी मुळात शिक्षक असल्यामुळे मला मुलांचा गौरव करण्यात फार अभिमान वाटत आहे. असे शेवटी गुणवंत विद्यार्थ्यांना उद्‌देशून म्हणाले.

या नंतर प्रमुख पाहुणे **सौ. शैलजा गिरकर,** उपमहापौर, मुंबई, यांच्या हस्ते संघाच्या संकेत स्थलाचे (Website:www.rohidassamaj.org) उद्‌घाटन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधीत करताना म्हटले की, मी १९९७ साली निवडून आले. तूमच्या आशिर्वादाने पुढेही निवडून आले. आजच्या या चढाओढीच्या युगात शिक्षण हवे. SC,ST यांना BMC मध्ये नोकरीसाठी जास्तीतजास्त गुण लागतात. आता शिक्षणाची स्पर्धा सुरू आहे. त्या स्पर्धेत तूम्ही पुढे रहा. यश आपोआप मिळेल.

नेहमी कार्यरत असणारा समाज कोणता तर तो ”रोहिदास समाज पंचायत संघ” अशी प्रसंसा त्यांनी केली. आताचे पालक समजदार झाले आहेत. त्या पुढे म्हणाल्या की, राजकारणात सर्वच चोर

पान ४ वर

# संत रोहिदास भवन निधी

संघाच्या वतीने बाधण्यात येत असलेल्या ''संत रोहिदास भवनास'' प्रत्येक घरातून किमान रु. १०००/– देणगी द्यावी असे ठरले होते. परंतु दिनांक १८/४/२०१० रोजी झालेल्या मध्यवर्ती कार्यकारिणीच्या सभेत सदर निधी प्रत्येक घरटी न घेता प्रत्येक सभासदांनी रु. १०००/– देणगी द्यावी असे एकमताने ठरले आहे. संघाच्या सर्व सभासदांनी यांची नोंद घेवून ज्यांनी ''संत रोहिदास भवनास'' देणगी दिली नसेल, त्यांनी ती त्वरीत द्यावी, असे आवाहन संघाचे अध्यक्ष श्री. भागुराम कदम यांनी केले आहे.


**सेवा दीप**

वर्ष ३७ वे अंक ५ वा फेब्रुवारी २०११

संपादक
**श्री. रघुनाथ मा. घानकुटकर** (S.E.O.)
(दलित मित्र)

मुद्रक व प्रकाशक
**श्री. भागुराम सोनू कदम** (अध्यक्ष)

व्यवस्थापक
**श्री. रवि विष्णू पेवेकर** (सरचिटणीस)

व्यवस्थापन–साहित्य समिती
**श्री. रामदास महादेव आंबोकर** (अध्यक्ष)
**श्री. राजेश गंगाराम कदम** (चिटणीस)

मुद्रण स्थळ : ड्रिम ग्राफिक्स, डोसा कंपाऊंड, के. के. मार्ग, मुंबई–४०० ०११

**कार्यालय व प्रकाशन स्थळ**
संत रोहिदास वसतिगृह, बी.डी.डी. चाळ क्र. २६ व २७ च्या मध्ये, मारुती मंदिर शेजारी, डिलाईल रोड, मुंबई–४०० ०१३,
**दूरध्वनी** : २३०२०३४०

रोहिदास समाज पंचायत संघाच्या मालकीचे पत्र मुद्रक व प्रकाशक संघाध्यक्ष श्री. भागुराम सोनू कदम यांनी रोहिदास समाज पंचायत संघासाठी प्रसिद्ध केले.


चर्मकार समाजाच्या सर्वांगिण उन्नतीकरिता महाराष्ट्र शासनाने ''संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची'' स्थापना केलेली आहे. सदर महामंडळाने चर्मकार समाजासाठी विविध योजना आखल्या आहेत. त्यांची माहिती क्रमशः सेवादीपमध्ये प्रसिद्ध करीत आहोत. गरजू समाज बंधू–भगिनींनी या योजनांचा लाभ घ्यावा.

– **श्री. भागुराम कदम** (अध्यक्ष)

## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# लिडकॉम
माहिती पुस्तिका

भाग २

## महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना

### २) बीज भांडवल योजना :

रु. ५०,०००/– ते रु. ५,००,०००/– पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणाऱ्या कोणत्याही योजनेसाठी बीज भांडवल योजनेअंतर्गत राष्ट्रीयकृत बॅकेमार्फत कर्ज पुरवठा सवलतीच्या दराने उपलब्ध करण्यात येतो. या योजनेअंतर्गत रु. ५०,०००/– पासून ते रु. ५,००,०००/– पर्यंतचा कर्जपुरवठा द.सा.द.शे. ९.५ ते १२.५ टक्के व्याज दराने बॅकेमार्फत करण्यात येतो. या योजनेअंतर्गत बॅकेने मंजूर केलेल्या कर्ज रक्कमेपैकी ७५ टक्के कर्ज रक्कम ही राष्ट्रीयकृत बॅकेमार्फत देण्यात येते. ५ टक्के रक्कम ही लाभार्थ्याने स्वतःचा सहभाग म्हणून बॅकेकडे जमा करावयाची असते. उर्वरित २० टक्के रक्कम ही महामंडळ बीज कर्ज म्हणून देते. त्या रक्कमेपैकी रु. १०,०००/– अनुदान म्हणून देण्यात येतात तर उर्वरित रक्क्म ही ४ टक्के या व्याजदराने बीज कर्ज म्हणून देण्यात येते. या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या कर्जाची परतफेड ही राष्ट्रीयकृत बॅकेस व महामंडळास ३६ ते ६० समान मासिक हप्त्यांत एकाचवेळी करावयाची असते.

### ५० टक्के अनुदान योजना व बीज भांडवल योजना सर्वसाधारण अटी व नियम:

१. अर्जदार हा अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाचा असावा.
२. अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा जास्त व ५० वर्षापेक्षा कमी असावे.
३. अर्जदार दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील असावा व त्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामिण भागासाठी रु. ३९,३०८/– व शहरी भागासाठी रु. ५४,४९६/– यापेक्षा जास्त असू नये. अर्जदारास तो करु इच्छिणाऱ्या व्यवसायाचे ज्ञान असावयास हवे. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा कायम रहिवासी असावा. अर्जदाराने अन्य शासकीय संस्थांकडून अनुदान घेतलेले नसावे व तो कोणत्याही संस्थेचा थकबाकीदार नसावा. अर्जदाराने सादर केलेला जातीचा व उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिकाऱ्याने दिलेला असावा.

क्रमशः

## विभाग क्र. १४ (विक्रोळी ते मुलुंड) 'विद्यार्थी गुणगौरव समारंभ संपन्न'

# देशाचे भवितव्य मुलांच्या हातात

प्रा. डॉ. जयसिंग फडतरे

देशाचे भवितव्य मुलांच्या हातात आहे. गुणवत्तेच्या जोरावर यशाची शिखरे गाठली पाहिजेत. परिस्थितीवर मात करुन शिक्षणाची जिद्द बाळगली तर यश मिळतेच. असे प्रतिपादन शुश्रुषा हॉस्पिटलचे संचालक **प्रा. डॉ. जयसिंग फडतरे** यांनी केले. विभाग समिती क्र. १४ च्या विद्यमाने विद्यार्थी गुणगौरव समारंभ, कन्नमवार नगर २, विक्रोळी, येथील रोहिदास बालवाडी सभागृहात दिनांक २४/१०/२०१० रोजी पार पडला. या प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आपल्याला मिळालेली शिष्यवृत्ती ही शिक्षणासाठी वापरली पाहीजे. पुढील शिक्षण आर्थिक दृष्टया परवडणारे नसते, म्हणून पालकांनी आतापासूनच आपल्या पाल्यासाठी विमा पॉलीसीच्या माध्यमातून आर्थिक तरतूद करावी.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभाग अध्यक्ष **श्री. कृष्णा काजरोळकर** हे होते. त्यांनी आपल्या भाषणात शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे. ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. अपयश जशी यशाची पहिली पायरी आहे. तसेच यश सुध्दा पहिलीच पायरी आहे. हे लक्षात ठेवून पुढे शिखर गाठायचे आहे. हे विद्यार्थ्यांनी ध्यानात घ्यावे. 'ध्येय निश्चित केल्याशिवाय वाट सापडत नाही' असे बहुमोल विचार यांनी मांडले.

प्रमुख पाहुणे संघ चिटणीस **श्री. गणेश चव्हाण** यांनी सांगितले की, दहावीच्या पुढचे शिक्षण योग्य मार्गदर्शनाने घ्यावे. पालकांनी याची दक्षता घेणे गरजेचे आहे. परळ येथे आपल्या जागेत संत रोहिदास भवन उभारण्यात येत आहे. यासाठी समाज बांधवाना आर्थिक सहकार्य करावे असे आवाहन केले.




डावीकडून विश्वस्त श्री. रामदास आंबोकर, संघ चिटणीस श्री. गणेश चव्हाण, विभाग अध्यक्ष श्री. कृष्णा काजरोळकर, प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. जयसिंग फडतरे, तहह्यात विश्वस्त श्री. शांताराम गोवळकर, शिक्षण समिती चिटणीस श्री. सुरेश जाळगावकर व माहिती देताना विभाग चिटणीस श्री. सुरेश चव्हाण

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभाग चिटणीस **श्री. सुरेश चव्हाण** यांनी केल. तर प्रास्ताविक **विश्वस्त श्री. रामदास आंबोकर** यांनी केले. यावेळी तहह्यात विश्वस्त **श्री. शांताराम गोवळकर,** संघ विश्वस्त आणि शिक्षण समितीचे चिटणीस **श्री. सुरेश जळगावकर,** पत्रकार **श्री. नासिकेत पानसरे,** शुश्रुषा हॉस्पिटलचे संचालक **श्री. सुरेश सरनोबत** आणि **श्री. संदीप बोधे,** आदी मान्यवर उपस्थित होते.

म्हाडाचे इंजिनियर **श्री. अनिल चिपळुणकर** यांनी M. Tech. पदवी संपादन केल्याबदद्ल, तसेच **कु. श्रेयसी चिपळूणकर** ही महाराष्ट्र राज्य परिषद, पुणे तर्फे शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल, तसेच **कु. स्नेहल दिपक शिरकर,** हीने पॅकींग टेक्नॉलॉजी मध्ये सुवर्ण पदक मिळाल्याबद्दल आणि **कु. अक्षय अनिल चिपळूणकर** याला दहावीत ९१% मिळाल्याबद्दल त्याचाही यथोचित सत्कार करण्यात आला. इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके व शिष्यवृत्ती देवून गौरवण्यात आले. शेवटी उपचिटणीस श्री. शांताराम देवळेकर यांनी आभार प्रदर्शन केले.

## 'रौप्य पदक' पटकावून 'राष्ट्रीय विद्यापीठ' पातळीवर निवड

सेवादीप स्थानिक पंचायत, नालासोपारा (प.) चे सभासद श्री. राजेंद्र कृष्णा विनेरकर यांची कन्या **कु. रूचिता राजेंद्र विनेरकर** हिने गुवाहाटी (आसाम) येथे नुकत्याच झालेल्या **नेमबाजी** 'पूर्व राष्ट्रीय' स्पर्धेत चांगले गुण मिळवून ती राष्ट्रीय पातळी स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे.



तसेच 'मुंबई विद्यापिठ' रूईया महाविद्यालय येथे नेमबाजीत 'रौप्य पदक' पटकावून तिची 'राष्ट्रीय विद्यापीठ' पातळीवर निवड करण्यात आली आहे. रोहिदास समाज पंचायत संघा तर्फे **हार्दिक शुभेच्छा !**

## विभाग क्र. १९ (मालाड ते दहिसर)

# ‘विद्यार्थी गुणगौरव व पारितोषिक वितरण सोहळा संपन्न’




डावीकडून प्रमुख पाहुण्या सौ. रूची वायंगणकर, विभाग अध्यक्ष श्री. अरविंद पेवेकर, साहित्य समिती अध्यक्ष व प्रमुख पाहुणे श्री. रामदास आंबोकर, विश्वस्त श्री. गणेश चव्हाण, विभाग चिटणीस श्री. सुनिल शिवतरकर व माहिती देताना विभाग उपाध्यक्ष श्री. दिनेश मेढेकर

विभाग क्र. १९ (मालाड ते दहिसर) तर्फे रविवार दिनांक ९/१०/२०१० रोजी, आकुर्ली म्युनिसिपल शाळेचा सभागृह, कांदिवली (पूर्व) येथे **"विद्यार्थी गुणगौरव व पारितोषिक वितरण सोहळा"** सपंन्न झाला. या सोहळया निमित्त प्रमुख अतिथी म्हणून **मा. श्री. रामदास आंबोकर,** अध्यक्ष, साहित्य समिती, यांनी विद्यार्थी व समाज बांधवांना यथोचित मार्गदर्शन करून संत रोहिदास भवनासाठी आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन केले.

नंतर प्रमुख अतिथी **मा. सौ. रूची राजन वायंगणकर,** ICICI बॅंकेच्या प्रबंधक, यांनी कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी बरीचशी करियर क्षेत्र उपलब्ध आहेत. ज्याकडे आपण सकारात्मक दृष्टीकोन ठेवून आपल्या बौध्दीक क्षमतेनुसार प्रयत्न करावेत असे संबोधिले.

सोहळयाचे व विभागाचे अध्यक्ष **मा. श्री. अरविंद पेवेकर,** यांनी मार्गदर्शनपर आपले आयुष्य कसे घडावे याबाबत वर्तमान

पान ५ वर

पान १ वरून

## ‘यशाकडे नेहमी पायरी म्हणून पाहिले पाहिजे’

आहेत, असे म्हणून तूम्ही राजकारणा पासून दूर होऊ नका. तूम्ही राजकारणात येवून तूमच्या शिक्षणाचा वापर करून त्यात सुधारणा करा. जी पिढी गेली ती जाऊ द्या, आता तूम्ही करा, असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थांना दिला.

यानंतर प्रमुख पाहुणे **श्री. आत्माराम सावर्डेकर,** प्रसिध्द् उद्योजक, शिक्षण कमी असून सुध्दा यशस्वी उद्योजक कसे व्हावे हे समाजाला मी दाखवून दिले आहे. विद्यार्थ्यांना त्यांनी एकच संदेश दिला की, मेहनत, परिश्रम, कष्ट, एकनिष्ठा ठेवा म्हणजे यश तूमच्या पायाशी येईल. सन्मान केल्याबद्दल सर्व समाज बांधवांना त्यांनी धन्यवाद दिले.

संघ अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा. श्री. भागुराम कदम,** यांनी नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले की, नियमित शिक्षण घेत असताना, अन्य शिक्षणाचे पर्याय स्विकारले पाहिजे. ज्यानी मार्ग बदलले ते आयुष्यात यशस्वी झाले. आता तर प्रथम क्रमांकासाठी एवढी मोठी स्पर्धा लागलेली असते की, १००% पेक्षा अधिक गुण असते तर तेही मिळविले असते. शिक्षण घेताना अनेक अडचणी असतात. पण अडचणीवर मात करतो त्याला अडचण भासत नाही. कारण त्याला त्याचे उध्दिष्ठ गाठायची असतात. संघाने गेले अनेक वर्षात हजारो विद्यार्थांचे सत्कार केल आहेत.

त्यांनी रोहिदास भवन निधीसाठी सविस्तर माहीती दिली. निधी जमा करताना माझ्या हातात जादूची कांडी नाही की ती फिरवली की लाखो रूपये जमा होतील. या करिता प्रत्येक बांधवांनी आर्थिक मदत दिली पाहिजे.

शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. सुभाष समजिस्कर यांनी प्रास्तावीक भाषण केले.

या वेळी इ. ७ वी ते पदव्युत्तर विद्यार्थांना पारितोषिके व शिष्यवृत्ती पाहूण्यांच्या हस्ते देण्यात आले. इ. १० वी व १२ वीत प्रथम क्रमांकाच्या मानकरी ठरलेल्या विद्यार्थांच्या पालकांचा सत्कार, सोहळयाचे प्रमुख अतिथी डॉ. मुकूंद सांगलीकर, सौ. शैलजा गिरकर व श्री. आत्माराम सावर्डेकर यांनी केले, संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम, उपाध्यक्ष श्री. विजय सावर्डेकर, कोषाध्यक्ष श्री. संजीव दाभोळकर, चिटणीस श्री. पंढरीनाथ जानवलकर व श्री. गणेश चव्हाण यांच्या हस्ते इतर विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला.

सोहळयाचे आभार प्रदर्शन समिती चिटणीस श्री. सुरेश जाळगांवकर यांनी केले. सोहळा यशस्वी रितीने पार पाडण्यात समिती सदस्य श्री. रामकृष्ण मठकर, श्री. हिरामण वायंगणकर व श्री. शांताराम देवळेकर इत्यादीचे सहकार्य लाभले.

सोहळयाचे सुत्रसंचालन संघ सरचिटणीस श्री. रवि पेवेकर यांनी आपल्या कौशल्याने केले. शेवटी राष्ट्रगीताने सोहळयाची सांगता झाली.

पान ४ वरून

**विभाग क्र. १९ (मालाड ते दहिसर)**

पत्रातले कात्रणावर स्पष्टीकरण दिले. विभाग विश्वस्त व संघ चिटणीस **मा. श्री. गणेश चव्हाण** यांनी प्रास्ताविक करताना विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर योग्य वेळी आहार कसा घ्यावा. याचे मार्गदर्शन केले.

यानंतर इयत्ता ५वी ते पदवी/पदविका अशा ६५ विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक व वस्तू रूपाने बक्षिस देऊन सत्कार करण्यात आला. तसेच इ. १० वीत समाजात प्रथम क्रमांकाचा मानकरी कु. सुमित मनोज आंगलेकर व इ. १२ वीत विभागात प्रथम क्रमांकाची मानकरी कु. वर्षा प्रकाश शिरीषकर यांच्या पालकांचा श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या सोहळयाचे सुत्रसंचालन चिटणीस श्री. सुनिल शिवतरकर व उपाध्यक्ष श्री. दिनेश मेढेकर यांनी केले. तर मनोगत विभाग अध्यक्षा सौ. भारती पवार यांनी व्यक्त केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री. सखाराम आंबेकर, श्री. रमेश पाटणकर, श्री. विजय केळकर, श्री. प्रकाश विनेरकर तसेच महिला चिटणीस सौ. ज्योती शिरकर, उपचिटणीस सौ. प्रणाली विनेरकर व अन्य महिला पदाधिकारी यांनी सोहळयाचे उत्कृष्ठ नियोजन केले. विद्यार्थी, पालक व समाजबंधू यांच्या उपस्थितीने संपूर्ण सभागृह भरल्यामुळे, उपस्थितांना धन्यवाद दिले. शेवटी राष्ट्रगीताने सोहळयाची सांगता झाली.

## कारकून पाहिजे

संघाच्या कार्यालयीन कामकाजा साठी अर्धवेळ (सायं. ६ ते ९.३०) या वेळेस कारकून पाहिजे. शिक्षण १२वी, संगणक ज्ञान आवश्यक. संपर्क–संघ कार्यालय. दूरध्वनी : २३०२०३४०

## मुलुंड (पूर्व) स्थानिक पंचायत, विभाग क्र. १४

# विद्यार्थी गुणगौरव व वार्षिक स्नेहसंमेलन समारंभ संपन्न



डावीकडून विभाग माजी उपाध्यक्ष श्री. नरेश चव्हाण, विभाग अध्यक्ष श्री. कृष्णा काजरोळकर, पंचायत अध्यक्ष श्री. बाळकृष्ण सावर्डेकर, संघ उपाध्यक्ष श्री. विजय सावर्डेकर, विभाग चिटणीस श्री. सुरेश चव्हाण व माहिती देताना पंचायत चिटणीस व विशस्त श्री. रामदास आंबोकर

मुलुंड (पूर्व) स्थानिक पंचायतीच्या वतीने रविवार दिनांक ५ डिसेंबर २०१० रोजी, राजे संभाजी हॉल, अरूणोदय नगर, नवघर रोड, मुलुंड (पूर्व) मुंबई–४०००८१. येथे पंचायतीचे अध्यक्ष **मा. श्री. बाळकृष्ण रतन सावर्डेकर** यांच्या अध्यक्षेते खाली "विद्यार्थी गुणगौरव व वार्षिक स्नेहसंमेलन" समारंभ मोठया थाटात संपन्न झाला.

सदरहू समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून विभाग अध्यक्ष **मा. श्री. कृष्णा काजरोळकर,** यांनी यशस्वी विद्यार्थ्याचे कौतुक करताना त्यांनी अभ्यास कसा करावा, पालकांनी आपल्या पाल्याशी कसे बोलावे, यासंबंधी बहुमोल मार्गदर्शन केले.

संघ उपाध्यक्ष **श्री. विजय सावर्डेकर** यांनी आपल्या अनमोल भाषणात, माझे प्रमुख पाहूणे म्हणून कुठेही उल्लेख नसताना मी समाजाच्या गुणगौरव कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित राहिलो कारण मला समाजाबददल आपुलकी आहे. मुलुंड पंचायतीचा हा भव्य दिव्य कार्यक्रम पाहून मी भारावून गेलो. मुलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनाची पध्दत फार चांगली होती. त्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना मोलाचे संदेश दिले.

रोहिदास समाजाची वास्तू उभी राहण्यासाठी जास्तीत जास्त निधी जमा करावा. असे आवाहन समस्त समाज बांधवांना केले.

विभागाचे माजी उपाध्यक्ष श्री. नरेश चव्हाण, यांनी मार्गदर्शन केले. व मुलुंड पंचायतीच्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत कौतूक केले. विभाग चिटणीस श्री. सुरेश चव्हाण यांनी ही सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे कौतूक केले.

कार्यक्रमाचे व पंचायतीचे अध्यक्ष मा. श्री. बाळकृष्ण सावर्डेकर यांनी अध्यक्षीय भाषणात आपली पंचायत विभागामध्ये व संघामध्ये नेहमीच कार्यशील व अग्रेसर राहिल यांची काळजी घेवू अशी ग्वाही दिली. संत रोहिदास भवन निर्मितीसाठी पंचायतीतून जास्तीत जास्त निधी संघाकडे जमा करावा असे उपस्थितीत सर्व समाज बांधवांना आवाहन केले.

या कार्यक्रम प्रसंगी पंचायत चिटणीस व विभागाचे विश्वस्त **मा. श्री. रामदास**

पान ८ वर

# संत रोहिदास भवन निधी देणगीदार

| अ.क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| २११० | श्री. काशिनाथ दामोजी कराडकर<br>कै. दामोजी कराडकर (वडील) यांच्या स्मरणार्थ | २६,०००/- |
| २१११ | श्री. अनिल गोविंद खोपकर<br>कै. गोपाल गोविंद खोपकर व<br>कै. सखुबाई गोपाल खोपरक यांच्या स्मरणार्थ | २५,००१/- |
| २११२ | श्री. सानिका अनिल खोपकर<br>कै. नारायण देवजी वायंगणकर व<br>कै. सुधा नारायण वायंगणकर यांच्या स्मरणार्थ | २५,००१/- |
| २११३ | श्री. गंगाराम गोविंद कदम (इनरकर)<br>कै. पार्वतीबाई गोविंद इनरकर यांच्या स्मरणार्थ | ५००१/- |
| २११४ | श्री. चंद्रकांत भिकू मेढेकर आणि बंधू<br>कै. अनुसया भिकू मेढेकर (आई) यांच्या स्मरणार्थ | ५००१/- |
| २११५ | श्री. अशोक रत्नू मुरुडकर<br>कै. किशोर रत्नू मुरुडकर यांच्या स्मरणार्थ | <br>२०००/- |
| २११६ | श्री. दिनेश पांडुरंग खेडेकर | ११११/- |
| २११७ | श्री. रमाकांत गोविंद शिर्के<br>कै. पूजा रमाकांत शिर्के | <br>११११/- |
| २११८ | श्री. सुभाष तानू देवळेकर | ११०१/- |
| २११९ | श्री. नामदेव महादेव सविनकर | १००१/- |
| २१२० | श्री. संदीप पांडुरंग खेडेकर<br>कै. पांडुरंग बाबाजी खेडेकर (वडील)<br>यांच्या स्मरणार्थ | १००१/- |
| २१२१ | श्री. विश्वनाथ सुरेश विनरकर | १००१/- |
| २१२२ | श्री. दिगंबर भागुराम पालशेतकर<br>कै. द्रौपदीबाई भागुराम पालशेतकर यांच्या स्मरणार्थ | १००१/- |
| २१२३ | श्री. कृष्णा रामचंद्र कोंडविलकर<br>कै. रामचंद्र सोनू कोंडविलकर (वडील)<br>यांच्या स्मरणार्थ | १००१/- |
| २१२४ | श्री. धर्माजी सिताराम शिवतरकर<br>कै. तुलसीबाई सिताराम शिवतरकर (मातोश्री)<br>यांच्या स्मरणार्थ | १००१/- |
| २१२५ | श्री. नामदेव रामचंद्र पालशेतकर | १००१/- |
| २१२६ | श्री. प्रमोद सुरेश माने | १००१/- |
| २१२७ | श्री. दिनेश भिकू आंबेकर<br>कै. भिकू सोनू आंबेकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१२८ | श्री. हेमंत सुरेश केळकर | १०००/- |
| २१२९ | श्री. राजेश सखाराम कोंडविलकर | १०००/- |
| २१३० | श्री. रविंद्र मधुकर शिरीसकर | १०००/- |

| अ.क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| २१३१ | श्री. दशरथ धोंडू काजरोळकर | १०००/- |
| २१३२ | श्री. काशिनाथ मालोजी चिपळूणकर<br>कै. ज्ञानू कृष्णा चिपळूणकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१३३ | श्री. दिपक भिकाजी सावर्डेकर<br>कै. द्रौपदी भिकाजी सावर्डेकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१३४ | श्री. मनोहर हरिश्चंद्र पेवेकर | १०००/- |
| २१३५ | श्री. विलास सोनू पेडामकर | १०००/- |
| २१३६ | श्री. बाळाराम अनंत कोंडविलकर<br>कै. अनंत सखाराम कोंडविलकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१३७ | श्री. रमेश धोंडू जानवलेकर<br>कै. धोंडू बाबू जानवलेकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१३८ | श्री. गुणाजी गोपाळ पावसकर<br>कै. गोपाळ सोनू पावसकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१३९ | श्री. पांडुरंग मनोहर खेडेकर<br>कै. मनोहर पांडुरंग खेडेकर व<br>कै. सावित्रीबाई मनोहर खेडेकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१४० | श्री. मनोहर भिमसेन इनरकर | १०००/- |
| २१४१ | श्री. राजेश सुर्यभान उदमले | १०००/- |
| २१४२ | श्री. गणेश लक्ष्मण देवरुखकर | १०००/- |
| २१४३ | श्री. श्रीकांत यशवंत पावसकर<br>कै. यशवंत राघो पावसकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१४४ | श्री. सुर्यकांत नामदेव सावर्डेकर | १०००/- |
| २१४५ | श्री. नागेश नरेंद्र चिपळूणकर | १०००/- |
| २१४६ | श्री. भरत मंगलदास देवरुखकर | १०००/- |
| २१४७ | श्री. अशोक शांताराम सविनकर | १०००/- |
| २१४८ | श्री. प्रशांत गणपत चिपळूणकर | १०००/- |
| २१४९ | श्री. सतिश दत्ताराम सावर्डेकर | १०००/- |
| २१५० | श्री. बाबू राघो कदम | १०००/- |
| २१५१ | श्री. योगेश भगवान कादवडकर | १०००/- |
| २१५२ | श्री. संदिप चिंतामण वायंगणकर<br>कै. चिंताबण विठ्ठल वायगंणकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१५३ | श्री. दशरथ कृष्णा सोनावणे | १०००/- |
| २१५४ | श्री. प्रकाश पांडुरंग वालेकर | १०००/- |
| २१५५ | श्री. निलेश नरेश कोंडविलकर | १०००/- |
| २१५६ | श्री. बिपीन मारुती मुरुडकर | १०००/- |
| २१५७ | श्री. रमेश महादेव मेढेकर | १०००/- |
| २१५८ | श्री. महेश भागुराम उनवरकर | १०००/- |
| २१५९ | श्री. परशुराम राघो शिर्के | १०००/- |

# संत रोहिदास भवन निधी देणगीदार

| अ.क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| २१६० | श्री. सुरेश शांताराम पेवेकर | १०००/- |
| २१६१ | श्री. सुरेश लक्ष्मण देवळेकर | १०००/- |
| २१६२ | श्री. बाळाराम वसंत शिरीसकर | १०००/- |
| २१६३ | श्री. श्याम रामदास पंदीरकर<br>कै. धोंडू सखाराम पंदिरकर (आजोबा)<br>यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१६४ | श्री. सखाराम धोंडू देवरुखकर<br>कै. धोंडू सुडक्या देवरुखकर (वडील)<br>यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१६५ | श्री. गणेश पांडुरंग खेडेकर<br>कै. पांडुरंग गोविंद खेडेकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१६६ | श्री. विष्णू सोनू जाधव | १०००/- |
| २१६७ | श्री. जनार्दन शंकर धयाळकर<br>कै. चंद्रकांत रामा कदम (सासरे) यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१६८ | श्री. नरेश भिकाजी कदम | १०००/- |
| २१६९ | श्री. गणपत बाबाजी चिखलकर<br>कै. भागीरथी बाबाजी चिखलकर (आई)<br>यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१७० | श्री. नितिन रामराव देवळेकर | १०००/- |
| २१७१ | श्री. मंगेश लक्ष्मण खेडेकर | १०००/- |
| २१७२ | श्री. विजय शरद मेढेकर | १०००/- |
| २१७३ | श्री. नारायण सखाराम शिवतरकर | १०००/- |
| २१७४ | श्री. अमोल रमेश आंबोकर<br>कै. रमेश गोविंद आंबोकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१७५ | श्रीमती प्रमिला प्रशांत खोपकर | १०००/- |
| २१७६ | श्री. बाबुराव विठ्ठल मुरुडकर<br>कै. विठ्ठल गणपत मुरुडकर (वडील) व<br>कै. रुक्मीणी विठ्ठल मुरुडेकर (आई)<br>यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१७७ | श्री. सतेज रामदास पेवेकर<br>कै. धर्माजी बाळा पेवेकर (आजोबा) व<br>कै. सखुबाई धर्माजी पेवेकर (आजी)<br>यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१७८ | श्री. अजित धर्माजी धयाळकर | १०००/- |
| २१७९ | श्री. अशोक भानू विन्हेरकर | १०००/- |
| २१८० | श्री. मनोहर व किशोर हरिश्चंद्र कदम<br>कै. हरिश्चंद्र विठ्ठल कदम यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१८१ | श्री. आदेश रघुनाथ कदम | १०००/- |

| अ.क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| २१८२ | श्री. अशोक परशुराम जानवलकर<br>कै. परशुराम देऊ जानवलकर (वडील)<br>यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१८३ | श्री. विष्णू बाळाराम विनेरकर<br>कै. बाळाराम शिवराम विनेरकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१८४ | श्री. सत्यवान विठ्ठल गोवळकर<br>कै. रुक्मीणी विठ्ठल गोवळकर (आई) व<br>कै. विठ्ठल नारायण गोवळकर (वडील)<br>यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१८५ | श्री. रुपेश रामदास बेलोसकर<br>कै. रामदास मारुती बेलोसकर (वडील)<br>यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१८६ | श्री. सुरेश पदीरकर<br>कै. संजय गणपत पंदीरकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१८७ | श्री. रामजी बाबू पंदीरकर<br>कै. लिलाबाई रामजी पंदीरकर (पत्नी)<br>यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१८८ | श्री. पंढरीनाथ रत्नू भेलेकर<br>कै. रत्नू सखाराम भेलेकर (वडील)<br>यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २१८९ | श्री. सुरेश विठ्ठल सावर्डेकर | १०००/- |
| २१९० | श्री. अशोक मुक्तेश्वर जानवलेकर | १०००/- |
| २१९१ | श्री. दिनकर सुरेश गोवळकर | १०००/- |
| २१९२ | श्री. बळीराम शिवाजी सावर्डेकर | १०००/- |
| २१९३ | श्री. सुरेश सिताराम आंबोकर | १०००/- |
| २१९४ | श्री. संतोष यशवंत भालेराव<br>कै. यशवंत बाबुराव भालेराव | १०००/- |
| २१९५ | श्री. मोहन तुकाराम पाटणकर | १०००/- |
| २१९६ | श्री. सुरेश काशिराम पेवेकर | १०००/- |
| २१९७ | श्री. रमेश महादेव पंदिरकर | १०००/- |
| २१९८ | श्री. मनोज मनोहर हातिपकर | १०००/- |
| २१९९ | श्री. संदेश सुरेश सावर्डेकर | १०००/- |
| २२०० | श्री. गोविंद काशिराम कसबेकर | १०००/- |
| २२०१ | श्री. शांताराम गंगाराम सावर्डेकर | १०००/- |
| २२०२ | श्री. संदेश हरिश्चंद्र मुरुडकर<br>कै. हरिश्चंद्र गोविंद मुरुडकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |
| २२०३ | श्री. सुधाकर महाजन वायंगणकर<br>कै. महाजन कृष्णा वायंगणकर यांच्या स्मरणार्थ | १०००/- |

(क्रमशः)

पान ५ वरून

**मुलुंड (पूर्व) स्थानिक पंचायत, विभाग क्र.१४**

**म. आंबोकर** यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते. त्यामध्ये लहान मुलांच्या चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. मुलांचे विविध प्रकारचे नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये मुलांबरोबर मोठयानीही सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला. विजयी स्पर्धकांना पारितोषिक व प्रमाण पत्र देऊन गौरविण्यात आले.

सदरहू कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. तसेच पंचायत पदाधिकाऱ्यांचे पुष्प गुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन चिटणीस श्री. रामदास आंबोकर यांनी अतिशय उत्कृष्ठ पध्दतीने केले.

सभासद **श्री. कैलाश दाभोळकर** यांनी LIC मधून जाहिरात आणल्याबददल त्यांचा पुष्प गुच्छ देवून गौरव करण्यात आला. तसेच LIC चे अधिकारी श्री. मनोहर पेवेकर सदर कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांचाही पुष्प गुच्छ देवून गौरव करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचायतीचे पदाधिकारी श्री. विजय चव्हण, श्री. सतेज चिखलकर, श्री. पुंडलिक रामपूकर, श्री. संदिप पंदिरकर, श्री. विजय जामसूतकर आदिनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाला महिला व समाज बांधव मोठया संखेने उपस्थित होते. या सर्वाचे चिटणीस श्री. रामदास आंबोकर यांनी आभार मानले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वधु-वर सुचक व महिला संघटन समिती

**आयोजित**

# वधु-वर व पालक परिचय मेळावा

**रविवार दिनांक २७ मार्च २०११, सायं. ५ वाजता**

स्थळ : ललित कला भवन, (बी.डी.डी. चाळ क्र. ८ समोर),
डिलाईल रोड, मुंबई – ४०० ०१३

मेळाव्याचे अध्यक्ष : **मा. श्री. भागुराम सोनू कदम** (अध्यक्ष, रोहिदास समाज पंचायत संघ, मुंबई)
प्रमुख अतिथी : **मा. श्री. सिताराम आंबेकर** (उद्योगपती)

समाज बंधू/भगिनींनो,

समाजातील विवाहेच्छूक मुलां–मुली करिता 'वधू–वर व पालक परिचय मेळावा' रविवार दिनांक २७ मार्च २०११ रोजी सांय. ५ वा. आयोजित करण्यात आला आहे. ह्या मेळाव्याकरिता समाजात बंधू–भगिनींकडून मिळणारा प्रतिसाद वाढतच आहे. सदरहू मेळाव्या निमित्ताने समाजातील विवाहेच्छूक मुला–मुलींना आपला योग्य जीवन–साथी निवडण्यास फार मोलाची मदत होते, म्हणून आपण उपवर उमेदवारासह या मेळाव्यात सहभागी व्हावे. ही विनंती.

***विशेष सूचना*** : उमेदवार आपली प्रथम पसंती फोटो, माहिती व प्रत्यक्ष मुलाखती द्वारे करतो. तेव्हा कृपया :

- नाव नोंदणी करतेवेळी आपले पासपोर्ट साईजचे दोन फोटो आणावेत.
- पंचायतीच्या शिफारसींसह आलेल्या उमेदवारांना नोंदणी शुल्क रु. १०५/– भरावे लागतील. जे संस्थेचे सभासद नाहीत अशांना नांव नोंदणी करते वेळी अर्ज शुल्क रु. ५/– व प्रवेश शुल्क रु. २००/– भरावे लागतील. ही नोंदणी एक वर्षाकरिता राहील.
- इच्छूक उमेदवाराशिवाय पालकांना प्रवेश दिला जाणार नाही.
- नविन नांवे नोंदणी व्यवस्था दि. १० मार्च २०११ ते २५ मार्च २०११,सांय. ६.३० ते ८.३० पर्यंत संघ कार्यालयात केली आहे.

## आदर्श शिक्षकेतर पुरस्कार



सौ. प्रेरणा प्रकाश जानवलकर,

विभाग समिती क्र. १ व सेवादीप स्थानिक पंचायतीचे चिटणीस श्री. प्रकाश सुदाम जानवलकर, यांची पत्नी **सौ. प्रेरणा प्रकाश जानवलकर,** यांस बृहन्मुंबई माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघ यांस तर्फे **"क. र. प्रभुदेसाई"** आदर्श शिक्षकेतर पुरस्कार मिळाल्या बदद्ल रोहिदास समाज पंचायत संघा तर्फे **हार्दिक शुभेच्छा !**

## कविता

**आठवणी**

काळाचे बाध फुटून जातात
वाहून जाते सहवासाचे पाणी
तरीही मैत्रीचा अंकुर
तग धरून राहतो

भिजत राहतात फक्त **"आठवणी"**
कधी सुखाने मन भरून येते
कधी वेदनानी झेले भिजतात
दिवस येतात, दिवस जातात
मनाला नेहमी छळत राहतात **"आठवणी"**

– प्रमोद रघुनाथ पालशेतकर